**प्रेसनोट दि. २९.०७.२०२२**

लोकसेवक श्री.प्रमोद मारूती कांबळे, वय ४६ वर्ष, व्यवसाय – वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र बिळूर ता.जत जि.सांगली रा.शिवाजी पेठ, जत ता.जत जि.सांगली यांना १०००/- रूपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र बिळूर येथिल डॉक्टर कांबळे यांनी उपचार करण्यासाठी ५००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज दि.२९.०७.२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २९.०७.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये कांबळे डॉक्टर यांनी तक्रारदार व त्यांची पत्नी यांचेवर उपचार करण्यासाठी ७००/- रूपये व तक्रारदार यांचे मित्राचा मुलगा यांचेवर उपचार करण्यासाठी ३००/- असे एकुण १०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच प्राथमिक आरोग्य केंद्र बिळूर ता.जत जि. सांगली येथे सापळा लावला असता लोकसेवक श्री.प्रमोद मारूती कांबळे, वैद्यकीय अधिकारी यांनी तक्रारदार व त्यांची पत्नी तसेच तक्रारदार यांचे मित्राचा मुलगा यांचेवर उपचार करण्यासाठी म्हणून तक्रारदार यांचेकडे ७००/- रूपये व तक्रारदार यांचे मित्राच्या मुलाकडे ३००/- रूपये असे एकूण १०००/- रूपये लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री.प्रमोद मारूती कांबळे, वय ४६ वर्ष, व्यवसाय – वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र बिळूर ता.जत जि.सांगली रा.शिवाजी पेठ, जत ता.जत जि.सांगली यांचे विरुध्द जत पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, संजय संकपाळ, भास्कर भोरे, संजय कलगुटगी, अजित पाटील, सलिम मकानदार, रविंद्र धुमाळ, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक ★ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली ★ सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner